प्रकरण ५

# निष्कर्ष व शिफारशी

# प्रकरण ५
# निष्कर्ष व शिफारशी

## ५.१ प्रास्ताविक

मागील प्रकरणात प्रश्नावली, मुलाखती व महाविद्यालयांच्या निकालपत्रकातून उपलब्ध झालेल्या माहितीचे विश्लेषण य विशदीकरण करण्यात आले होते. या प्रकरणात विश्लेषण-विशदीकरणातून प्राप्त झालेले निष्कर्ष तसेच त्याअनुषंगाने शिफारशी दिल्या असून पुढील संशोधनासाठी काही विषयही सुचविण्यात आले आहेत.

## ५.२ निष्कर्ष

शिवाजी विद्यापीठाच्या जून १९९२ पासून चालू असलेल्या बी.एड्. सुधारित अभ्यासक्रमाबाबत खालील निष्कर्ष मिळाले.

१. बी.एड्. भाग १ व बी.एड्. भाग २ च्या गुणांच्या दृष्टिने दिलेला ५० %, ५० %, भारांश योग्य आहे.(को.४.३)

२. शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अंतर्गत मूल्यमापनासाठी ठरविलेल्या बाबी (सूक्ष्म अध्यापन, वर्ग अध्यापन, अंतर्गत परीक्षा इ.) योग्य आहेत किंवा पुरेशा आहेत. (को.४.४)

३. अंतर्गत मूल्यमापनासाठी प्रत्येक बाबीस दिलेला गुणांचा भारांश योग्य आहे.(को.४.५)

**अंतर्गत मूल्यमापनाबाबत खालीलप्रकारचे निष्कर्ष प्राप्त झाले.**

१. अंतर्गत मूल्यमापनासाठी विविध प्रकारची मूयमापन साधने वापरली जात नाहीत तरीदेखिल प्रतिसादकांना अंतर्गत मूल्यमापनासाठी उपयोगात आणलेली साधने पुरेशी वाटतात. (को.४.८)

२. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सध्याचे अंतर्गत मूल्यमापन हे वस्तुनिष्ठ नसते.(को.४.९)

३. मूल्यमापन वस्तुनिष्ठ व्हावे म्हणून प्रतिसादकांनी खालील उपाय सुचविले (को.४.१०)

१. मूल्यमापन काटेकोरपणे व्हावे.

२. प्रत्येक अंतर्गत मूल्यमापनासाठी असलेल्या बाबींची सखोल गुण विभागणी व्हावी.

३. सराव पाठांचे सुरवातीपासून शेवटपर्यंत निरीक्षण व्हावे.

४. विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष काम बघूनच अंतर्गत गुण द्यावेत.

५. गुणात्मक मूल्यमापन साधनांचा वापर करावा.

६. पूर्वीच्या अहवालांची कॉपी करणाऱ्यांना कमी गुण द्यावेत.

७. प्रात्यक्षिक कामाचा दर्जा पाहूनच गुणदान करावे.

८. सवंग लोकप्रियतेसाठी जादा गुण देणे टाळावे.

९. विद्यापीठातील विविध महाविद्यालयात वापरल्या जाणाऱ्या मूल्यमापन पध्दतींचा एकमेकांना परिचय व्हावा.

१०. प्रात्यक्षिक कार्याची एकात्मक तपासणी व्हावी.

११. योग्य मूल्यमापनासाठी साधनांची रचना करावी.

१२. पेपरच्या २० गुणांच्या प्रात्यक्षिकासाठी कांही मुद्दे देऊन वस्तुनिष्ठता आणता येईल.

१३. प्रत्यक्ष प्रात्यक्षिक चालू असताना गुण द्यावेत. गुण देताना प्रात्यक्षिकाला विशिष्ठ निकष द्यावेत.

१४. इतर महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांना बोलावून अंतर्गत कार्याचे मूल्यमापन करावे.

१५. बी.एड्. प्रशिक्षण दोन वर्षाचे असावे.

१६. पाठ निरीक्षणासाठी असलेल्या मुद्यांप्रमाणेच प्रत्येक कामासाठी मुद्दे द्यावेत व त्यांना तसा महत्वांश द्यावा.

१७. प्रमाणित मूल्यमापन चाचण्या असाव्यात.

१८. शिक्षक प्रशिक्षकाचा अध्यापन भारांश कमी करुन प्रात्यक्षिकांचे मूल्यमापनासाठी वेळ द्यावा.

१९. प्रात्यक्षिक संदर्भातील मुलाखतीचा महत्वांश वाढवावा.

२०. वार्षिक पाठ परीक्षेस पूर्वीप्रमाणेच अन्य महाविद्यालयाचे परीक्षक नेमावेत.

४. विद्यार्थ्यास प्रत्यक्ष दिले जाणारे गुण व विद्यापीठास कळविले जाणारे गुण यात फरक नसतो असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. (को.४.११)

५. विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक कामे व त्यांचे मूल्यमापन करताना दिलेले गुण यांचा सहसंबंध असतो असे मत असणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण जास्त असल्याचे (८८%) दिसून येते. (को.४.१२)

६. विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक कामाचे मूल्यमापन करताना येणाऱ्या खालील अडचणी प्रतिसादकांना जाणवतात. (को.४.१३)

१. मूल्यमापनास पुरेसा वेळ नसतो.

२. मूल्यमापनाची साधने नसतात.

३. आपण केलेले मूल्यमापन व महाविद्यालयाने केलेल्या मूल्यमापनात फरक असता.

४. मूल्यमापन वेळचेवेळी होत नाही.

५. मूल्यमापन संदर्भात प्रशिक्षण नाही.

६. प्राचार्यांचे मूल्यमापनासाठी सहकार्य नाही.

७. अंतर्गत मूल्यमापन कसे करावे समजत नाही.

प्रात्यक्षिक परिपूर्ण नसते पण अंतर्गत गुण कमी पडतात म्हणून गुण द्यावे लागतात.

मूल्यमापनास पुरेसा वेळ मिळत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांची संख्या शेकडा ४६ टक्के आहे तर मूल्यमापनाची साधने उपलब्ध नसतात असे मत मांडणाऱ्या प्रतिसादकांची संख्या शेकडा ३४ टक्के आहे. तसेच मूल्यमापनासंदर्भात प्रशिक्षण नसल्याचे मत व्यक्त करणारे ४८ टक्के प्रतिसादक असल्याचे दिसते. विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक पूर्ण नसते परंतू अंतर्गत गुण कमी पडतात म्हणून कांही वेळेस सढळ हाताने गुण द्यावे लागतात असे मत मांडणाऱ्या प्रतिसादकांची संख्या २४ टक्के आहे.

७. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकांचे मूल्यमापन करण्यासाठी प्रात्यक्षिक परीक्षा या मूल्यमापन साधनांचा सर्वात जास्त म्हणजे वापर करता येईल. तसेच तोंडी परीक्षांचा , प्रासंगिक नोंदी,प्रश्नावली, मुलाखती, पदनिश्चयन श्रेणी, नामनिर्देशन तंत्रे ही साधने प्रतिसादकांनी सुचविलेली आहेत.(को.४.१४)

८. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकांचे मूल्यमापन करण्यासाठी प्रासंगिक नोंदी, लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा, मुलाखती इत्यादी मूल्यमापन साधनांचा वापर केला जातो.(को.४.१५)

९. प्रत्यक्षात दिले जाणारे अंतर्गत गुण व त्यांची खरी गुणवत्ता यात फरक असतो असे जवळजवळ शेकडा ४८ टक्के प्रतिसादकांना वाटते.(को.४.१६)

१०. प्रात्यक्षिकांना सढळ हाताने गुण दिले जातात असे मत व्यक्त करणाऱ्या प्रतिसादकांची संख्या शेकडा ५२ टक्के आहे (को.४.१७)

११. प्रात्यक्षिकांची कॉपी केली जाते तरी गुणदानात फरक पडतो, पडत नाही अशी दोन्ही मते मांडणाऱ्या प्रतिसादकांची संख्या सारखीच असल्याचे दिसून येते.(को.४.१८)

१२. शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शै. मूल्यमापन हा विषय शिकविला जातो तरीदेखील विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन करताना शैक्षणिक मूल्यमापनाची तत्वे पाळली जात नाहीत (को.४.१९)

१३. विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापनाचे गुण व त्यांना मिळणारे सैध्दांतिक परीक्षेतील गुण यांचा सहसंबंध असतो असे मत प्रतिपादन करणाऱ्या प्रतिसादकांची संख्या जवळजवळ ४८ टक्के आहे. तसेच वरील मताशी सहमत नसणाऱ्या प्रतिसादकांची संख्या जवळजवळ ४२ टक्के आहे. प्रतिसादकांच्या प्रतिसादावरुन असे दिसून येते की अंतर्गत मूल्यमापनाचे गुण व मिळणारे सैध्दांतिक परीक्षेतील गुण यांचा सहसंबंध असतो असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. (को.४.२०)

**सूक्ष्म अध्यापन**

१४. सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण कार्यक्रमात प्रत्येक सूक्ष्म अध्यापन पाठांसाठी निरीक्षण नोंद पत्रकांचा वापर सर्वच महाविद्यालयात केला जातो. (को.४.२१)

१५. सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण कार्यक्रमाचे पाठ सुरु असतानाच सर्व महाविद्यालयात मूल्यमापन केले जाते. (को.४.२२) सूक्ष्म अध्यापन पाठाचे मूल्यमापन करण्यासाठी ४४टक्के महाविद्यालयांमध्ये टेपरेकॉर्डर हे साधन वापरले जाते अन्य साधने फारशी वापरली जात नाहीत. (को.४.२३)

१६. सूक्ष्म अध्यापन सराव कार्यात विद्यार्थ्यांना प्रत्याभरण देण्यासाठी चर्चा, मार्गदर्शन, व निरीक्षण नोंद तक्त्यावर लिहून इत्यादी प्रकारे प्रत्याभरण केले जाते. (को.४.२४)

१७. सूक्ष्म अध्यापन कौशल्यांचे मूल्यमापन सूक्ष्मपणे केले जात नाही त्यामुळे सूक्ष्मअध्यापनाचा हेतू साध्य होत नाही या मतास सहमत असणाऱ्या प्रतिसादकांची संख्या शेकडा २९ टक्के आहे तर याच विधानास असहमत असणाऱ्या प्रतिसादकांची संख्या शेकडा ४८ टक्के आहे तर पूर्णत: असहमत असणाऱ्यांची संख्या शेकडा १२ टक्के आहे. म्हणजेच सूक्ष्म अध्यापन कौशल्यांचे मूल्यमापन सूक्ष्मपणे केले जाते असे सांगणाऱ्या प्रतिसादकांची संख्या जास्त आहे. (को.४.२५)

**सराव पाठ**

१८. छात्र शिक्षक सरावपाठ घेतानाच त्या प्रत्येक सरावपाठाचे मूल्यमापन केले जाते असे मत मांडणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ९८ टक्के असल्याचे दिसते. म्हणजेच जवळजवळ सर्वच महाविद्यालयातील प्राध्यापक छात्र शिक्षकांचा सरावपाठ सुरु असतानाच मूल्यमापन करतात. (को.४.२६)

१९. जवळजवळ सर्वच महाविद्यालयात सरावपाठानंतर प्रत्याभरण दिले जाते. (को.४.२७)

२०. विद्यार्थ्यांच्या सरावपाठाच्या मूल्यमापनाबाबत समाधानी असणाऱ्या प्रतिसादकांची संख्या शेकडा ६८ टक्के आहेम्हणजेच सरावपाठाच्या मूल्यमापन बऱ्याच ठिकाणी समाधानकारकपणे केले जाते.(को.४.२८)

२१. सरावपाठांचे मूल्यमापन करताना शिक्षक-प्रशिक्षकांना पूर्णपाठ निरीक्षण करता येत नाही, शिक्षक-प्रशिक्षकांच्या उपस्थितीने विद्यार्थी०शिक्षकाचा पाठ चांगला होत नाही, दडपण येते, व्यक्तिनिष्ठता येते, इत्यादी अनेक अडचणी शिक्षक-प्रशिक्षकांनी सांगितल्या आहेत.(को.४.३०)

२२. सराव पाठांचे मूल्यमापन हा केवळ उपचार आहे. शिक्षक-प्रशिक्षक खरे मूल्यमापन करतातच असे नाही, या विधानाशी सहमती दर्शविणारे प्रतिसादक शेकडा ३६ टक्के आहेत तसेच वरील विधानाशी सहमत नसणाऱ्या प्रतिसादकांची संख्या शेकडा २८ टक्के आहे. पूर्णतः असहमत असणाऱ्या प्रतिसादकांची संख्या शेकडा २८ टक्के आहे. यावरुन असे दिसते की, वरील विधानाशी सहमत नसणाऱ्यांची संख्या जास्त प्रमाणात आहे. (को.४.३१)

२३. सराव पाठाच्या मूल्यमापनातून विद्यार्थी शिक्षकास सातत्याने प्रत्याभरण दिल्याने पहिला पाठ व शेवटचा पाठ यात फरक असतो असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. (को.४.३२)

**आशययुक्त अध्यापन**

२४. जवळजवळ सर्व महाविद्यालयात आशययुक्त अध्यापन पध्दतीचे सत्र सुरु असतानाच मूल्यमापन केले जाते. (को.४.३३)

२५. आशययुक्त अध्यापन पध्दती – अहवाल लेखन प्रात्यक्षिकाची कॉपीकेली जात नाही असे ७० % प्रतिसादकांना वाटते. (को.४.३४) विद्यार्थी जर कॉपी करत असतील तर त्याचा गुणांवर परिणाम होतो.

२६. विद्यार्थ्यांतील सूक्ष्म भेदभावक्षमतानुसार गुण देता येत नाहीत. थोड्याफार फरकाने गुण सारखेच मिळतात. त्यामुळे खरे कष्ट करणाऱ्यांना कॉपी करणाऱ्यांप्रमाणेच गुण मिळतात. विद्यार्थ्यांना वस्तुनिष्ठ गुण मिळत नसतात. त्यामध्ये व्यक्तिनिष्ठता येत असे काही प्रतिसादकांना वाटते. (को.४.३५)

२७. आशययुक्त अध्यापन पध्दतीचे मूल्यमापन करताना व्यक्तिनिष्ठता येत नाही असे सांगणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण शेकडा ८२ टक्के आहे. (को.४.३६)

२८. आशययुक्त अध्यापन पध्दतीतील तीन वेगळ्या पध्दतींच्या पाठांचे नेमके मूल्यमापन करणे अवघड जाते असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. (को.४.३७)

२९. आशययुक्त अध्यापन कृतीसत्रानंतर घेतली जाणारी चाचणी समाधानकारक नसते या मतास असहमत असणाऱ्यांची संख्या जास्त आहे. यावरुन आशययुक्त अध्यापन पध्दतीची चाचणी समाधानकारक असते असे दिसून येते. (को.४.३८)

**मूल्यमापनावर विशेष प्रशिक्षण**

३०. जवळजवळ सर्वच महाविद्यालयात मूल्यमापन कृतीसत्र सुरु असतानाच विद्यार्थ्यांच्या कामाचे मूल्यमापन केले जाते. (को.४.३९)

३१. मूल्यमापन कृतीसत्राचे मूल्यमापन झाल्यावर विद्यार्थ्यांना शेकडा ९० टक्के महाविद्यालयात प्रत्याभरण दिले जाते. (को.४.४०)

३२. मूल्यमापन कृतीसत्रामध्ये ज्याप्रमाणे मूल्यमापन कसे करावे हे शिकविले जाते, शिक्षक-प्रशिक्षक त्या तंत्रानुसारच मूल्यमापन करतात या मताला सहमती असणारे प्रतिसादक जवळजवळ ७० टक्के आहेत. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापक ज्या पध्दतीने मूल्यमापन करण्याची पध्दती शिकवितात त्याप्रमाणेच विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करतात. (को.४.४२)

**सैध्दांतिक पेपर्सची प्रात्यक्षिके**

३३. सैध्दांतिक पेपर्सशी निगडीत प्रात्यक्षिके म्हणजे औपचारिकता नाही असे अनेक प्रतिसादकांना वाटते. (को.४.४२)

३४. सैध्दांतिक विषयाचे गुण व प्रात्यक्षिकांचे गुण यात सहसंबंध असतो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांची संख्या शेकडा ४२ टक्के असून सैध्दांतिक विषयांचे गुण व प्रात्यक्षिकांचे गुण यात कांही संबंध नसतो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांची सख्या ५८ टक्के आहे. यावरुन असे दिसते की सैध्दांतिक विषयाचे गुण व प्रात्यक्षिकांचे गुण यात कांही संबंध नसतो असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण जास्त आहे. (को.४.४३)

३५. सैध्दांतिक पेपर्सच्या निगडीत प्रात्यक्षिकांमुळे त्या विषयाचे सविस्तर सखोल दर्शन विद्यार्थ्यांना घडते असे बहुतेक शिक्षक-प्रशिक्षकांना वाटते. (को.४.४४)

३६. सैध्दांतिक विषयाच्या प्रात्यक्षिकांचे मूल्यमापन म्हणजे मुक्त हस्ताने गुणदान केले जात नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण शेकडा ८० टक्के आहे व प्रात्यक्षिकांचे मूल्यमापन म्हणजे मुक्त हस्ताने गुणदान केले जाते असे मत मांडणाऱ्यांचे प्रमाण फक्त १२ टक्के आहे. (को.४.४५)

**समाजसेवा**

३७. समाजसेवा कोणत्या स्तरावर घेतली जाते असे विचारले असता ८२ टक्के महाविद्यालयात सामाजिक स्तरावरील समाजसेवा घेतली जाते तर शालेय स्तरावरील समाजसेवा ३२ टक्के महाविद्यालयात घेतली जाते आणि महाविद्यालयीन स्तरावर ६० टक्के महाविद्यालयात घेतली जाते. म्हणजेच सामाजिक स्तरावरील समाजसेवा सर्वात अधिक प्रमाणात घेतली जात असल्याचे दिसते. (को.४.४६)

३८. समाजसेवेचे काम सुरु असतानाच मूल्यमापन करणाऱ्या महाविद्यालयांची संख्या एकूणच जास्त असल्याचे दिसून येते. (को.४.४७)

३९. समाजसेवेचे मूल्यमापन करण्यासाठी पदनिश्चयन श्रेणीयुक्त नोंदतक्ते तयार केले जात नाहीत. (को.४.४८)

४०. समाजसेवेसाठी वेगळी प्रात्यक्षिक परीक्षा असावी असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ५४ टक्के असून समाजसेवेची प्रात्यक्षिक परीक्षा नसावी अशाप्रकारे प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ४६ टक्के आहे. समाजसेवेसाठी सध्या असलेली प्रात्यक्षिक परीक्षा पुरेशी नसून वेगळी प्रात्यक्षिक परीक्षा ठेवण्याची गरज असल्याचे दिसून येते. (को.४.४९)

४१. समाजसेवा कार्यक्रम व त्याचे होणारे मूल्यमापन यांच्यात तारतम्य असते या मतास सहमत असणारे प्रतिसादक ६८ टक्के आहेत. (को.४.५०)

**कार्यानुभव**

४२. कार्यानुभव कोणत्या प्रकारचा देता असे विचारले असता २८ टक्के महाविद्यालयात खडू तयार करुन घेतले जातात तर २४ टक्के महाविद्यालयात फाईल्स तयार करुन घेतल्या जातात. पॉईंटर तयार करण्याचे काम १० टक्के महाविद्यालयात करुन घेतले जाते. लिफाफे तयार करण्याचे काम २८ टक्के महाविद्यालयात होते. म्हणजेच समाजोपयोगी वस्तू तयार करण्याचा कल अनेक महाविद्यालयात असल्याचे दिसून येते. (को.४.५१)

४३. कार्यानुभवाचे जवळजवळ ८८ टक्के महाविद्यालयांमध्ये प्रक्रिया व निष्पत्ती या दोन पातळीवर मूल्यमापन केले जाते. तर १२ टक्के महाविद्यालयांमध्ये प्रक्रिया व निष्पत्तीचा विचार न करता मूल्यमापन केले जाते. यावरुन जवळजवळ सर्वच महाविद्यालयात प्रक्रिया व निष्पत्ती या दोन पातळीवर मूल्यमापन होते. (को.४.५२)

४४. महाविद्यालयातील कार्यानुभवाच्या अहवालात जर साम्यता आढळली तर त्याचा गुणावर परिणाम होतो असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ६८ टक्के असून, ३२ टक्के प्रतिसादक विद्यार्थ्यांच्या अहवालात साम्यता जरी आढळली तरी गुणांवर कोणींही परिणाम होत नाही अशा मताचे आहेत. (को.४.५३)

४५. कार्यानुभवाचे प्रात्यक्षिक पूर्ण नसेल तर सढळ हाताने गुणदान केले जात नाही असे सांगणाऱ्यांचे प्रमाण तुलनात्मक जास्त असल्याचे दिसून येते. (को.४.५४)

**अभ्यासानुवर्ती कार्यक्रम**

४६. अभ्यासानुवर्ती कार्यक्रमातील विद्यार्थ्यांच्या सहभागाची नोंद नोंदवहीत सर्वच महाविद्यालयांमध्य ठेवली जाते. (को.४.५५)

४७. अभ्यासानुवर्ती कार्यक्रमातील विद्यार्थ्यांच्या सहभागाचे मूल्यमापन, विद्यार्थ्यांचा सहभाग किती आहे त्याचबरोबर कोणत्या प्रकारचा सहभाग आहे यावरुन केले जाते. (को.४.५६)

४८. प्रासंगिक नोंद पत्रकाद्वारे अभ्यासानुवर्ती कार्यक्रमातील विद्यार्थ्यांच्या सहभागाचे मूल्यमापन केले जाते असा प्रतिसाद देणाऱ्यांचे प्रमाण ८४ टक्के आहे. (को.४.५७)

४९. अभ्यासानुवर्ती कार्यक्रमात जे विद्यार्थी सहभागी होत नाहीत त्यांना गुण दिले जात नाहीत असे सांगणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ५० टक्के आहे. (को.४.५८)

५०. अभ्यासानुवर्ती उपक्रमांचे विद्यार्थ्यांची गुणवत्ता व आपण केलेले मूल्यमापन यात फरक नसतो असे म्हणणाऱ्यांची संख्या ७६ टक्के आहे. (को.४.५९)

५१. अभ्यासानुवर्ती उपक्रमांचे विविध नोंद पत्रकांच्या सहाय्याने सतत मूल्यमापन करावयास हवे असे मत मांडणाऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. (को.४.६०)

**शारीरिक शिक्षणाची प्रात्यक्षिके**

५२. विद्यापीठाच्या नियमानुसार जवळजवळ सर्व महाविद्यालयामध्ये शारीरिक शिक्षणाची प्रात्यक्षिके करून घेतली जातात. (को.४.६१)

५३. प्रात्यक्षिक कार्य पाहून शारीरिक शिक्षणाची कौशल्ये मोजली जातात. (को.४.६२)

५४. अभ्यासक्रमातील मार्गदर्शनानुसार बऱ्याच महाविद्यालयात शारीरिक शिक्षण या विषयाचे मूल्यमापन केले जाते. (को.४.६३) शारीरिक शिक्षण या प्रात्यक्षिकाचे मूल्यमापन करताना फक्त लेखी अहवाल पाहूनच मूल्यमापन केले जात नाही. (को.४.६४)

५५. शारीरिक शिक्षणासाठी असलेले अंतर्गत गुण पुरेसे आहेत असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. (को.४.६५)

५६. शारीरिक शिक्षणाचे मूल्यमापन करण्यासाठी स्वतंत्र क्रीडा शिक्षकांची गरज आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांची संख्या जास्त आहे. (को.४.६६)

**प्रपाठ/निबंध लेखन**

५७. सर्वच महाविद्यालयात प्रपाठ/निबंध लेखनासाठी परीक्षा पध्दती वापरली जाते. (को.४.६७)

५८. प्रपाठ/निबंध लेखनाने वार्षिक परीक्षेच्या अभ्यासावर व मूल्यमापनावर चांगला परिणाम होतो असे प्रतिपादन करणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण जास्त आहे. (को.४.६८)

५९. प्रपाठ तपासल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्यांना त्यांचे गुणदोष सांगितले जातात अशा प्रतिसादकांची संख्या ९० टक्के आहे. (को.४.६९)

६०. प्रपाठासंबंधित दिले जाणारे गुण भरमसाठ असतात या मतास उलटा प्रतिसाद मिळाला. प्रपाठासाठी दिले जाणारे गुण भरमसाठ नसतात असे म्हणणारे प्रतिसादक सर्वात जास्त म्हणजेच ८५ टक्के आहेत. (को.४.७०)

६१. एका पेपरच्या एका विभागाचा एकच प्रपाठ घेतला जातो त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे लिहिण्याचा पुरेसा सराव होत नाही, परिणामी विद्यार्थी वार्षिक परीक्षेत समाधानकारकपणे उत्तरे लिहू शकत नाहीत या मतास सहमती देणारे प्रतिसादक ४६ टक्के आहेत, तर वरील विधानाशी सहमत नसणारे प्रतिसादक ४० टक्के आहेत. (को.४.७१)

**अंतर्गत परीक्षा**

६२. सर्वच महाविद्यालयामध्ये अंतर्गत परीक्षा घेतली जाते. (को.४.७२)

६३. वार्षिक परीक्षेतील सैध्दांतिक विषयाचे गुण आणि अंतर्गत परीक्षेचे गुण यात संबंध असतो असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. (को.४.७३)

६४. अंतर्गत परीक्षा व वार्षिक परीक्षेचे स्वरुप सारखेच असते असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण १४ टक्के आहे. (को.४.७४)

६५. जवळजवळ सर्वच महाविद्यालयात अंतर्गत परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासल्या जातात, विद्यार्थ्यांना दाखविल्या जातात व परीक्षा हा सोपस्कार रहात नाही असे प्रतिसादकांच्या प्रतिसादावरुन दिसते. (को.४.७५)

**प्रात्यक्षिक परीक्षा**

६६. अंतर्गत परीक्षक व बाह्य परीक्षक यांच्या वार्षिक पाठाच्या मूल्यमापनात फरक जाणवतो असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. (को.४.७६)

६७. वार्षिक पाठाच्या मूल्यमापनासाठी जी मूल्यमापन साधने वापरली जातात त्याबाबत समाधानी असणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण ७८ टक्के आहे, यावरुन मूल्यमापन साधनाबाबत समाधानी असणाऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. (को.४.७७)

६८. वार्षिक पाठ निरीक्षणासाठी गेल्यावर परीक्षकांचे विद्यार्थ्यावर दडपण येते व त्याचा परिणाम पाठावर होतो व परिणामी मूल्यमापनावर होतो या मताशी सहमत असणाऱ्यांचे प्रमाण ४२ टक्के आहे, तर मतास सहमत नसणाऱ्यांचे प्रमाण ५८ टक्के आहे. (को.४.७८)

६९. जवळजवळ ९० टक्के वार्षिक पाठ परीक्षेच्या वेळी विद्यार्थी-शिक्षकांची तोंडी परीक्षा घेताना नोंद तक्त्यांचा वापर केला जातो.यावरुन वार्षिक पाठ परीक्षेच्या वेळी विद्यार्थी-शिक्षकांची तोंडी परीक्षा घेताना नोंद तक्त्याचा वापर केला जातो असे प्रतिपादन करणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. (को.४.७९)

७०. वार्षिक पाठ परीक्षेत घेतलेल्या केवळ २ पाठांवरुन विद्यार्थी-शिक्षकांचे मूल्यमापन करणे योग्य नव्हे या मताशी सहमत असणाऱ्यांची संख्या ७२ टक्के आहे, तर असहमत असणाऱ्यांची संख्या १८ टक्के आहे. यावरुन असे दिसून येते की, केवळ दोन वार्षिक पाठांवरुन विद्यार्थी-शिक्षकांचे मूल्यमापन करणे योग्य नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण जास्त आहे. (को.४.८०)

७१. वार्षिक पाठ परीक्षा रद्द करुन घेतला जाणारा प्रत्येक सराव पाठ परीक्षा समजून गुणांकन करावे व त्यांचे एकत्रित गुण द्यावेत असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांची संख्या ७० टक्के आहे. यावरुन वार्षिक पाठ परीक्षा रद्द करुन घेतला जाणारा प्रत्येक सराव पाठ परीक्षा समजून गुणांकन करावे या मताशी सहमत असणाऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.(को.४.८१)

७२. क्षमताधिष्ठित शिक्षक-शिक्षणाची संकल्पना प्रचलित बी.एड्. अभ्यासक्रमात राबवून विद्यार्थी-शिक्षकांच्या किमान अपेक्षित क्षमतांचे मूल्यमापन केले पाहिजे या मतास सहमती दर्शविणारे प्रतिसादक जास्त असल्याचे दिसते. (को.४.८२)

**~~शिक्षणशास्त्र~~ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सैध्दांतिक विषयात (बी.एड्.भाग-१) व प्रात्यक्षिक कामात (बी.एड्. भाग-२) मिळालेल्या गुणांच्या तुलनेतून मिळालेले निष्कर्ष**

७३. शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित ११ शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या सन १९९७-९८ व सन १९९८-९९ या दोन वर्षांच्या निकालपत्रकांची छाननी केली असता खालील निष्कर्ष प्राप्त झाले.

७४. सर्व महाविद्यालयातील दोन्ही वर्षांचा निकाल पाहता बी.एड्.भाग १ व २ मधील मध्यमानात खूप मोठी तफावत दिसून येते, तसेच प्रमाणित विचलनातही फरक दिसून येतो.

(को.४.८३,४.८८,४.९३,४.९८,४.१०३,४.१०८,४.११३,४.११८,४.१२३,४.१२८,४.१३३)

७५. खालील महाविद्यालयातील १९९७-९८ मधील विद्यार्थ्यांच्या बी.एड्. भाग १ व भाग २ मधील सहसंबंध गुणक अत्यल्प आहे, यावरुन यावर्षी प्रात्यक्षिकाचे गुण देताना विद्यार्थ्यांच्या सैध्दांतिक विषयातील प्राविण्याचा विचार या महाविद्यालयातून केला गेला नाही असे स्पष्ट होते.

१. श्रीमती ताराबाई अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर (सहसंबंध गुणक ०.३९५१७९)

२. वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर (सहसंबंध गुणक ०.२५३९१३)

३. छत्रपती शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, रुकडी (सहसंबंध गुणक ०.३७९८९)

४. इचलकरंजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, इचलकरंजी (सहसंबंध गुणक ०.३२६२९१)

५. वसंतराव कॉलेज ऑफ एज्युकेशन, इस्लामपूर (सहसंबंध गुणक ०.३४७११५)

६. कॉलेज ऑफ एज्युकेशन, विटा (सहसंबंध गुणक ०.३७९८५२)

७. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, फलटण (सहसंबंध गुणक -०.०१९४६)

७६. खालील महाविद्यालयातील १९९७-९८ मधील विद्यार्थ्यांच्या बी.एड्. भाग १ व भाग २ मधील सहसंबंध गुणक मध्यम आहे, यावरुन यावर्षी प्रात्यक्षिकाचे गुण देताना विद्यार्थ्यांच्या सैध्दांतिक विषयातील प्राविण्याचा विचार या महाविद्यालयातून काही प्रमाणात केला गेला असावा असे स्पष्ट होते.

१. सावित्रीबाई फुले महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर (सहसंबंध गुणक ०.४५२५१६)

२. सोलापूर सोशल कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर (सहसंबंध गुणक ०.५५४९६)

३. महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अकलूज (सहसंबंध गुणक ०.४५७१११)

४. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कराड (सहसंबंध गुणक ०.५५२५१८)

७७. खालील महाविद्यालयातील १९९८-९९ मधील विद्यार्थ्यांच्या बी.एड्. भाग १ व भाग २ मधील सहसंबंध गुणक अत्यल्प आहे, यावरुन यावर्षी प्रात्यक्षिकाचे गुण देताना विद्यार्थ्यांच्या सैध्दांतिक विषयातील प्राविण्याचा विचार या महाविद्यालयातून केला गेला नाही असे स्पष्ट होते.

१. सावित्रीबाई फुले महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर (सहसंबंध गुणक ०.२३२७८३)

२. इचलकरंजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, इचलकरंजी (सहसंबंध गुणक ०.३४३२०५)

३. वसंतराव कॉलेज ऑफ एज्युकेशन, इस्लामपूर (सहसंबंध गुणक ०.३८०७५४)

४. कॉलेज ऑफ एज्युकेशन, विटा (सहसंबंध गुणक ०.४०३१५९)

५. महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अकलूज (सहसंबंध गुणक ०.१३८०६२)

६. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, फलटण (सहसंबंध गुणक ०.३२२१४२)

७८. खालील महाविद्यालयातील १९९८-९९ मधील विद्यार्थ्यांच्या बी.एड्. भाग १ व भाग २ मधील सहसंबंध गुणक मध्यम आहे, यावरुन यावर्षी प्रात्यक्षिकाचे गुण देताना विद्यार्थ्यांच्या सैध्दांतिक विषयातील प्राविण्याचा विचार या महाविद्यालयातून काही प्रमाणात केला गेला असावा असे स्पष्ट होते.

१. छत्रपती शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, रुकडी (सहसंबंध गुणक ०.४२७४०७)

२. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कराड (सहसंबंध गुणक ०.४८४३१८)

७९. खालील महाविद्यालयातील १९९८-९९ मधील विद्यार्थ्यांच्या बी.एड्. भाग १ व भाग २ मधील सहसंबंध गुणक घनिष्ठ आहे, यावरुन यावर्षी प्रात्यक्षिकाचे गुण देताना विद्यार्थ्यांच्या सैध्दांतिक विषयातील प्राविण्याचा विचार या महाविद्यालयातून बऱ्याच प्रमाणात केला गेला असावा असे स्पष्ट होते.

१. श्रीमती ताराबाई अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर (सहसंबंध गुणक ०.८०८०१४)

२. वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर (सहसंबंध गुणक ०.७४६००५)

३. सोलापूर सोशल कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर (सहसंबंध गुणक ०.८९३८६५)

८०. बी.एड्. भाग १ आणि भाग २ यांच्या मध्यमानात काहीही फरक नसावा अशी अपेक्षा असते. सर्वच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या १९९७-९८ मधील गुणांचा विचार करता हा मध्यमानातील फरक सार्थक ठरल्याने दिसून आले. यावरुन या महाविद्यालयांनी १९९७-९८ च्या बी.एड्.भाग २ परीक्षेत विद्यार्थ्यांना सढळ हाताने गुण दिले असावेत असा निष्कर्ष निघतो. भाग १ व भाग २ मधील मध्यमानातील महाविद्यालनिहाय फरक खालीलप्रमाणे -

१. श्रीमती ताराबाई अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर (५७.५९२७)(को.४.८४)

२. वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर (१०८.०८८६)(को.४.८९)

३. छत्रपती शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, रुकडी (८२.१२)(को.४.९४)

४. सावित्रीबाई फुले महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर (७८.८८)(को.४.९९)

५. इचलकरंजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, इचलकरंजी (५७.०९)(को.४.१०४)

६. वसंतराव कॉलेज ऑफ एज्युकेशन, इस्लामपूर (८३.५२)(को.४.१०९)

७. कॉलेज ऑफ एज्युकेशन, विटा (४६.८)(को.४.११४)

८. सोलापूर सोशल कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर (९०.५५)(को.४.११९)

९. महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अकलूज (६७.८५)(को.४.१२४)

१०. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कराड (८७.४९)(को.४.१२९)

११. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, फलटण (८१.८१)(को.४.१३४)

८१. बी.एड्. भाग १ आणि भाग २ यांच्या मध्यमानात काहीही फरक नसावा अशी अपेक्षा असते. खालील सर्वच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या १९९८-९९ मधील गुणांचा विचार करता हा मध्यमानातील फरक सार्थक ठरल्याने दिसून आले. यावरुन या महाविद्यालयांनी १९९८-९९ च्या बी.एड्.भाग २ परीक्षेत विद्यार्थ्यांना सढळ हाताने गुण दिले असावेत असा निष्कर्ष निघतो. भाग १ व भाग २ मधील मध्यमानातील महाविद्यालनिहाय फरक खालीलप्रमाणे -

१. वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर (९४.९७५)(को.४.९१)

२. छत्रपती शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, रुकडी (७३.४८)(को.४.९६)

३. कॉलेज ऑफ एज्युकेशन, विटा (६८.६८)(को.४.११६)

४. सोलापूर सोशल कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर (६५.९९)(को.४.१२१)

५. महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अकलूज (७६.९)(को.४.१२६)

६. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कराड (१००.४)(को.४.१३१)

७. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, फलटण (७४.४५)(को.४.१३६)

८२. बी.एड्. भाग १ आणि भाग २ यांच्या मध्यमानात काहीही फरक नसावा अशी अपेक्षा असते. खालील सर्वच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या १९९८-९९ मधील गुणांचा विचार करता हा मध्यमानातील फरक सार्थक नसल्याचे दिसून आले. यावरुन या महाविद्यालयांनी १९९८-९९ च्या बी.एड्.भाग २ परीक्षेत विद्यार्थ्यांना सढळ हाताने गुण दिले नसावेत असा निष्कर्ष निघतो. भाग १ व भाग २ मधील मध्यमानातील महाविद्यालनिहाय फरक खालीलप्रमाणे -

१.श्रीमती ताराबाई अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर (७६.६१२५)(को.४.८६)

२. सावित्रीबाई फुले महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर (८९.१)(को.४.१०१)

३. इचलकरंजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, इचलकरंजी (५४.२५)(को.४.१०६)

४. वसंतराव कॉलेज ऑफ एज्युकेशन, इस्लामपूर (६०.२४)(को.४.१११)

८३. खालील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना १९९७-९८ मध्ये भाग १ व भाग २ मध्ये मिळालेल्या गुणांचे प्रमाण विचलनातील फरक सार्थक नसल्याने विचारात घेण्याजोगा नाही असा निष्कर्ष निघतो.

१.श्रीमती ताराबाई अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर (६.६२०८८)(को.४.८५)

२. वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर (१७.८८४०६)(को.४.९०)

३. सावित्रीबाई फुले महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर (१६.७६)(को.४.१००)

४. इचलकरंजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, इचलकरंजी (२.५५)(को.४.१०५)

५. वसंतराव कॉलेज ऑफ एज्युकेशन, इस्लामपूर (७.९१)(को.४.११०)

६. सोलापूर सोशल कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर (९.२४)(को.४.१२०)

७. महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अकलूज (१३.६८)(को.४.१२५)

८. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कराड (१०.७६२)(को.४.१३०)

९. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, फलटण (१.४३)(को.४.१३५)

८४. खालील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना १९९७-९८ मध्ये भाग १ व भाग २ मध्ये मिळालेल्या गुणांचे प्रमाण विचलनातील फरक सार्थक ठरल्याने विचारात घेण्याजोगा आहे असा निष्कर्ष निघतो.

१. छत्रपती शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, रुकडी (३.५३)(को.४.९५)

२. कॉलेज ऑफ एज्युकेशन, विटा (१३.२८)(को.४.११५)

८५. खालील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना १९९८-९९ मध्ये भाग १ व भाग २ मध्ये मिळालेल्या गुणांचे प्रमाण विचलनातील फरक सार्थक नसल्याने विचारात घेण्याजोगा नाही असा निष्कर्ष निघतो.

१.श्रीमती ताराबाई अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर (१८.९०३८१)(को.४.८७)

२. वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर (२०.०२३१३)(को.४.९२)

३. छत्रपती शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, रुकडी (२५.४०)(को.४.९७)

४. इचलकरंजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, इचलकरंजी (१६.१३)(को.४.१०७)

५. वसंतराव कॉलेज ऑफ एज्युकेशन, इस्लामपूर (१७.८९)(को.४.११२)

६. कॉलेज ऑफ एज्युकेशन, विटा (७.४१)(को.४.११७)

७. सोलापूर सोशल कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर (८.००)(को.४.१२२)

८. महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अकलूज (२६.५४)(को.४.१२७)

९. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कराड (३१.२९)(को.४.१३२)

८६. खालील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना १९९८-९९ मध्ये भाग १ व भाग २ मध्ये मिळालेल्या गुणांचे प्रमाण विचलनातील फरक सार्थक ठरल्याने विचारात घेण्याजोगा आहे असा निष्कर्ष निघतो.

१. सावित्रीबाई फुले महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोल्हापूर (१५.४६)(को.४.१०२)

२. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, फलटण (२९.६७)(को.४.१३७)

८७. सैध्दांतिक परीक्षा आणि प्रात्यक्षिक परीक्षा (अंतर्गत मूल्यमापन व बाह्य मूल्यमापन) मधील संबंध कमी प्रमाणात आहे. सैध्दांतिक परीक्षेत आणि प्रात्यक्षिक परीक्षेत फार मोठ्या प्रमाणात विषमता आढळते.

८८. विद्यार्थी शिक्षकांचे प्रात्यक्षिक विषय हे सैध्दांतिक विषयापेक्षा अधिक चांगले असलेले दिसतात.

८९. विद्यार्थी शिक्षकांना दिले जाणारे अंतर्गत गुण हे अनुदानित महाविद्यालयापेक्षा विनाअनुदानित महाविद्यालयात अधिक दिले जातात.

९०. जवळजवळ ९० टक्के विद्यार्थी हे सैध्दांतिक परीक्षेत पास होतात.

९१. गुणवत्ता यादी पाहिली असता विनाअनुदानित महाविद्यालये पहिल्या तर अनुदानित महाविद्यालये दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

९२. विनाअनुदानित महाविद्यालयांच्या अंतर्गत गुणदानाचा विचार केला असता असे दिसून येते की, ९० टक्के ते ९९ टक्के गुण दिलेली उदाहरणे आहेत.

९३. सराव अध्यापनातील पाठांचे वैयक्तिक मूल्यमापन तसेच अन्य प्रात्यक्षिक कामाचे मूल्यमापन त्या त्या प्राध्यापकाने करणे आवश्यक वाटते. महाविद्यालयातील प्राध्यापक वर्गानी असे सांगितले की, अंतर्गत मूल्यमापनात झुकते माप असते आणि दिलेले गुण हे पूर्वग्रह मनात धरुन दिले जातात.

९४. अंतर्गत मूल्यमापनाची पध्दतीही अशी आहे की किमान ७० टक्के गुण सर्वांना दिले जातात दिवसेंदिवस सराव अध्यापनाकरिता मिळालेल्या प्राध्यापकांच्या चांगल्या वाईट श्रेणीबद्दल विचार न करता विद्यार्थी-शिक्षक गुण मात्र मिळवितात.

## ५.३ शिफारशी

वरील संशोधनाच्या आधारे तसेच प्रविसादकांकडून आलेल्या प्रतिसादांतून शिवाजी विद्यापीठाच्या प्रचलित अभ्यासक्रमाबाबत, अंतर्गत मूल्यमापनाबाबत तसेच सर्वसामान्य अशा खालील शिफारशी सुचविण्यात आहेत.

१. मूल्यमापन कृतिसत्र, मूल्यशिक्षण, शालेय अनुभव कार्यक्रम, सराव पाठात व्यक्तिगत गुणांचा विचार, सामान्यज्ञान इत्यादी बाबींचा अंतर्भाव करण्यात यावा.

२. सूक्ष्म अध्यापनास २० गुण व आशययुक्त अध्यापन पध्दतीस ८० गुण या ऐवजी दोन्हीला ५०टक्के, ५०टक्के गुण असावेत कारण वेळ दोन्हीलाही सारखाच असतो.

३. बी.एड्.भाग एक साठी ४० टक्के गुण असावेत व बी.एड्.भाग दोन साठी ६० टक्के गुण असावेत.

४. अंतर्गत मूल्यमापन कार्यासाठी प्रशिक्षकांना शाळेत प्रतिनियुक्ती द्यावी व त्यांचे प्रशिक्षण कार्य तेथेच पूर्ण करावे.

५. दिलेला भारांश क्षमतेवर आधारित असावा.

६. श्रेणी पध्दती मधील त्रुटी तात्काळ काढून टाकाव्यात व गुण वर्ग (Class) मध्ये द्यावेत.

७. एखाद्या बाबीसाठी निश्चित केलेल्या कालावधीस अनुसरुन गुणांकन असावे.

८. पाठास २०० गुण असावेत.

९. अंतर्गत परीक्षेचा भारांश वाढवावा.

१०. वार्षिक पाठ परीक्षेचे गुण व वर्षभरातील सराव पाठाचे गुण समाविष्ट व्हावेत.

११. सराव पाठावर अधिक गुणांचा भारांश असावा.

१२. शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सध्या वापरात असलेली मूल्यमापन साधने पुरेशी वाटत नसल्याने प्रतिसादकांनी खालीलपमाणे काही मूल्यमापन साधने सुचविलेली आहेत. (को.४.८)

१. शिक्षणशास्त्र विभागाने प्रश्नावली तयार करुन द्यावी. कृतीसत्र आयोजित करावे.

२. मुलाखती, तोंडी परीक्षा, पडताळा सूची तयार करावीम

३. गुण देताना वस्तुनिष्ठता आवश्यक आहे.

४. टेप, व्हिडिओ यांचा समावेश मूल्यमापन साधने म्हणून उपयोग करावा.

५. वार्षिक पाठ परीक्षेचे गांभीर्य असावे.

६. प्रत्येक प्रात्यक्षिकाची अंतर्गत परीक्षा घ्यावी. प्रमाणित मूल्यमापन श्रेण्या तयार कराव्यात

७. मूल्यमापन करताना अभियोग्यता चाचण्या, अभिरुची शोधिका द्यावी. व्यावसायिक क्षमताधिष्ठित शाब्दिक व अशाब्दिक कसोट्या द्याव्यात.

८. अध्यापनाच्या अनुषंगाने इतर क्षेत्रातील कार्याचे मूल्यमापन प्रासंगिक नोंदीच्या सहाय्याने करावे.

वरील साधनांपैकी मुलाखती, तोंडी परीक्षा, पडताळा सूची या साधनांवर अधिक भर द्यावा असेही सुचविण्यात आले आहे.

१३. प्रतिसादकांनी सराव पाठाचे मूल्यमापन करण्यासाठी खालील सुधारणा सुचविल्या. (को.४.२९)

१. प्रत्येक पाठाचे सूक्ष्म निरीक्षण व्हावे.

२. पूर्णवेळ निरीक्षण व्हावे.

३. शैक्षणिक साधनांचा विद्यार्थ्यांकडून वापर व्हावा.

४. प्रत्येक पायरीवर सखोल चिंतन व्हावे.

५. अध्यापनाचा मानसिक आराखडा तयार झाल्यानंतर पाठ घेतला जावा.

६. प्रत्येक पाठ पायरीनुसार योग्य सूचना दिल्या पाहिजेत. मोघम शेरे मारु नयेत.

७. पाठानंतर चर्चा करावी.

८. पाठाचा आदर्श नमुना विद्यार्थ्यांना दाखवावा.

९. शिक्षक-प्रशिक्षकाप्रमाणेच त्याच्या सहाध्यायाकडून पाठाचे मूल्यमापन व्हावे.

पुन्हा सरावपाठ घेण्यास सांगणे.

१०. व्यक्तिगत कौशल्याचा प्रभाव याचा विचार व्हावा.

११. प्रत्येक पाठ वार्षिक पाठाप्रमाणे व्हावा.

१२. टेपरेकॉर्डरच्या सहाय्याने त्यांच्या पाठातील त्रुटी दूर कराव्यात.

१३. सेतू पाठाप्रमाणेच सर्व कौशल्यांचे उपघटक पडताळायला हवेत. शिवाय प्रत्येक मुद्याला सारखाच भारांश नको, तर अधिक उपयोग होणाऱ्या कौशल्याला अधिक भारांश हवा.

१४. सराव पाठाचे निरीक्षण करताना तेथेच दुरुस्तीकरण करावे.

पाठ जोपर्यंत अपेक्षित गुणवत्तेपर्यंत येत नाही तोपर्यंत पुनर्अध्यापन घ्यावे याकरीता पाठांची संख्या कमी केले तरी चालेल.

१५. गुणदान पाठ टाचणावरील पडताळा सूची/निरीक्षण सूची नुसार व्हावे.

१६. मूल्यमापन व्यक्तिनिष्ठ असू नये.

१७. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील कालावधी हा कमी वाटतो, तो दोन वर्षाचा करावा.

१८. सराव अध्यापनाचा भाग हा अतिशय गडबडीने पूर्ण केला जातो. शाळा अध्यापन सरावासाठी मिळत नाहीत. प्रशिक्षकांना पदवीच्या परीक्षेसाठी घेतलेल्या विषयांचे पाठ घेण्याची संधी दिली जात नाही. तसेच अत्यावश्यक असणाऱ्या शैक्षणिक कामे करण्यासाठी शिक्षक-विद्यार्थी उत्साही नसतात. त्याचा परिणाम म्हणजे प्रशिक्षणार्थी सराव अध्यापनात कमी भाग घेतात. यासाठी विशेष चर्चासत्र घेऊन सुधारणा व्हावी.

१४. प्रात्यक्षिक कामे ही देखील अभ्यासक्रमातील अतिशय महत्वाचा भाग असून त्याचे नियोजन अतिशय विचारपूर्वक करावे.

१५. शा.शिक्षण, समाजसेवा, कार्यानुभव अभ्यासानुवर्ती उपक्रम यासारख्या प्रात्यक्षिकांसाठी त्यात प्रशिक्षित शिक्षक-प्रशिक्षकांची नेमणूक करावी. शिक्षक-प्रशिक्षकांचे प्रशिक्षण करवून घ्यावे.

१६. दरवर्षी प्रात्यक्षिकांचे स्वरूप बदलण्याचा प्राध्यापकांनी प्रयत्न करावा, म्हणजे कॉपीचे प्रमाण कमी होईल. प्रात्यक्षिकांची कॉपी टाळण्यासाठी लॉटरी पध्दतीने प्रात्यक्षिके दिली जावीत.

१७. काही प्रात्यक्षिके लादलेली आहेत, त्यांचा शाळेत शिकविताना काही उपयोग होत नाही अशी भावना विद्यार्थी-शिक्षकात तसेच शिक्षक-प्रशिक्षकात दिसून येते. प्रात्यक्षिकांची गरज, कार्यवाही व मूल्यमापन यावर कृतीसत्रांचे आयोजन होणे आवश्यक आहे.

१८. बी.एड्. भाग १ चे निकाल ९०% पेक्षा कमी नसतात, परीक्षा पध्दतीत आमुलाग्र सुधारणा अपेक्षित आहे. विविध चर्चासत्रे घेऊन यावर ठोस निर्णय घेतले जावेत.

१९. प्रात्यक्षिकांचे मूल्यमापन करण्यासाठी मूल्यमापन साधने विकसित केली जावीत.

## ५.४ पुढील संशोधनासाठी विषय

या संशोधनाचे काम करीत असताना मिळालेल्या अनुभवातून व मिळालेल्या निष्कर्षावरून पुढील संशोधनासाठी खालीलप्रमाणे काही संशोधन विषय सुचविता येतील.

१. शिक्षणशास्त्र महाविद्यालयात बी.एड्. भाग २ साठी विविध प्रात्यक्षिके आहेत, या प्रात्यक्षिकांची उपयुक्तता, कार्यपध्दती, वेळेच्या दृष्टीने भारांश, गुणांच्या दृष्टीने भारांश यावर संशोधन होणे आवश्यक आहे.

२. विविध प्रात्यक्षिक कामांचे मूल्यमापन अधिक यथार्थ, विश्वसनीय, उद्दिष्टानुसार व वस्तुनिष्ठ होणे आवश्यक असल्याने मूल्यमापनाची विविध साधने विकसित करणे गरजेचे आहे. मूल्यमापन साधनांची निर्मिती व विकास हा संशोधनाचा एक चांगला विषय होऊ शकेल.

३. विविध प्रात्यक्षिकांचा एक वर्षाच्या अभ्यासक्रमात समावेश न करता काही प्रात्यक्षिकांचे अल्प मुदतीचे प्रशिक्षण कार्यक्रम तयार करणे शक्य आहे. असे कार्यक्रम तयार करणे व त्यांची उपयुक्तता तपासून पहाणे यावर संशोधन करता येईल.

४. क्षमताधिष्ठित शिक्षक-शिक्षण कार्यक्रम तयार करणे व तो प्रायोगिक तत्वावर राबवून त्याची परिणामकारकता आजमाविणे हाही संशोधनाचा एक विषय होऊ शकेल.

५. विविध महाविद्यालयातून विद्यार्थी-शिक्षकांकडून करून घेण्यात आलेली प्रात्यक्षिके व त्यांची गुणवत्ता यावर तुलनात्मक संशोधन होणे आवश्यक आहे.

६. संशोधकाने प्रस्तुत संशोधनात केवळ अकरा शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे १९९७-९८ व १९९८-९९ चे निकालपत्रक अभ्यासले, सर्व महाविद्यालयांची गेल्या किमान पाच वर्षांची निकालपत्रके विचारात घेऊन त्यांचे विश्लेषण करणे व बी.एड्. भाग १ व २ मधील सहसंबंधाचा शोध घेणे हा संशोधनाचा चांगला विषय होऊ शकेल.